सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.
डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

**संदर्भ क्र. विविमं/२०२६-२७/२००** **दि. २०/०८/२०२६**

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग, पुणे.

विषय : ‘अंमली पदार्थमुक्त महाराष्ट्र - व्यूहरचना व कृती योजनेबाबत.’
संदर्भ : मा. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांचे जा.क्र. संकीर्ण-२०२५/ई १८०४०७२/वि शि ५ दि. १८/०८/२०२६ रोजीचे पत्र.

**महोदय/महोदया,**

मा. उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये, ‘अंमली पदार्थमुक्त महाराष्ट्र-व्यूहरचना व कृती योजना’ या विषयाबाबत दि. १६/०७/२०२६ रोजी मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत झालेल्या निर्णयानुसार (अ.क्र. १२) सर्व शैक्षणिक संस्थांचा/महाविद्यालय तसेच विद्यापीठाचा परिसर हा Drug Free Campus ठेवण्याबाबत निकष निश्चित करणे, तसेच सर्व Campus अंमली पदार्थ मुक्त कसे होतील याबाबत प्रभावी मोहीम राबविण्याबाबत चर्चा करण्यात आली.

वर नमूद चर्चेच्या मुद्याच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या निर्णयानुसार सर्व महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था आणि विद्यापीठ परिसरामध्ये संदर्भीय पत्रामध्ये नमूद केलेल्या मुद्यांची योग्य ती अंमलबजावणी करून प्रभावी मोहीम राबविण्याबाबत सूचित करण्यात आले.

**सोबत : वरीलप्रमाणे.**

**(डॉ. सविता कुलकर्णी)**
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक-४२१,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२

दूरध्वनी क्र ०२२-२२७९३१७१ Email ID : vishi5.hted-mh@mah.gov.in

---

क्र. संकीर्ण-२०२५/**ई १८०४०७२**/ वि शि ५ दिनांक :- १८/०८/२०२६

प्रति-

१) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.
२) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.
३) संचालक, कला संचालनालय, मुंबई.
४) कुलसचिव, सर्व सार्वजनिक विद्यापीठे.

विषय - **"अंमली पदार्थमुक्त महाराष्ट्र-व्यूहरचना व कृती योजना"** विषयाबाबत गृह विभाग यांचेकडून दि.१६.०७.२०२६ रोजी मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखालील आयोजित **बैठकीचे कार्यवृत्त आवश्यक कार्यवाहीकरिता**

संदर्भ - उपसचिव, गृह विभाग / वि.शा.३(अ) , मंत्रालय, मुंबई यांचे क्र. संकीर्ण ०७२६ / प्र.क्र.२८५/ विशा -३ (अ) दिनांक १०/०८/२०२६ चे पत्र (**प्रत सोबत**)

महोदय,

गृह विभाग यांचेकडून अंमली पदार्थमुक्त महाराष्ट्र-व्यूहरचना व कृती योजना विषयाबाबत दिनांक १६/०७/२०२६ रोजी मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीचे कार्यवृत्त संदर्भाधीन पत्रासोबत संबंधित विभागांना आवश्यक कार्यवाहीकरिता पाठविण्यात आलेले आहे.

सदरहू कार्यवृत्तात या विभागाशी संबंधित खालील बाब नमूद आहे---

| अ.क्र. | चर्चेचा मुद्दा | बैठकीत घेतलेले निर्णय | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| १२ | सर्व शैक्षणिक संस्थांचा / महाविद्यालय तसेच विद्यापीठाचा परिसर हा Drug Free Campus ठेवण्याबाबत निकष निश्चित करणे. तसेच, सर्व Campus अंमली पदार्थ मुक्त कसे होतील याबाबत प्रभावी मोहीम राबविण्याबाबत चर्चा करण्यात आली. | सर्व शैक्षणिक संस्थांचा / महाविद्यालय तसेच विद्यापीठाचा परिसर हा Drug Free Campus ठेवण्याबाबत निकष निश्चित करणे, तसेच, सर्व Campus अंमली पदार्थ मुक्त कसे होतील याबाबत प्रभावी मोहीम राबविणे. | उच्च शिक्षण विभाग |

२. तरी या विभागाशी संबंधित उपरोक्त अ क्र. १२ मध्ये नमूद चर्चेच्या मुद्याच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या निर्णयाबाबत या विभागाच्या अंतर्गत येणा-या सर्व विद्यापीठांना / शैक्षणिक संस्थांना आवश्यक सूचना देण्यात याव्यात, ही विनंती.

आपला,

(प्रविण अकोलंकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**सोबत** - वरीलप्रमाणे

प्रत - सर्व सह सचिव / उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग , मंत्रालय, मुंबई.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
मंत्रालय (मुख्य इमारत), दुसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
Email ID : home.spl३a@maharashtra.gov.in

**बैठकीचे कार्यवृत्त** क्रमांक:संकीर्ण-०७२६/प्र.क्र.२८५/विशा-३(अ)

दिनांक : १०.०८.२०२६

प्रति,

१. अपर मुख्य सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव,अन्न व औषध प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव,नगर विभाग-२, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव, क्रीडा व युवक कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. सचिव, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३. पोलीस आयुक्त, मुंबई.
१४. विशेष पोलीस महानिरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य, पुणे.

विषय :- अंमली पदार्थमुक्त महाराष्ट्र-व्यूहरचना व कृती योजना बैठकीबाबत.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी दि.१६.०७.२०२६ रोजी मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली **"अंमली पदार्थमुक्त महाराष्ट्र-व्यूहरचना व कृती योजनेबाबत"** बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे कार्यवृत्त आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

आपली,

10/8/26

(यमुना जाधव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :- आवश्यक त्या माहितीस्तव -

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.

२. मा. राज्यमंत्री (गृह-ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. राज्यमंत्री (गृह-शहरे) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
७. उप सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
८. निवडनस्ती/ विशा-३(अ).

## मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजीत बैठकीचे कार्यवृत्त.

विषय:- अंमली पदार्थमुक्त महाराष्ट्र-व्यूहरचना व कृती योजनेबाबतची बैठक.
दिनांक व वेळ :- १६ जुलै,२०२६ रोजी दुपारी ०१.३० वाजता.

| अ.क्र. | बैठकीस उपस्थिती मान्यवर | विभाग/पद |
|---|---|---|
| १ | मा.श्री.योगेश कदम | मा. राज्यमंत्री (गृह-शहरे), मंत्रालय, मुंबई. |
| २ | श्री. राजेश अग्रवाल | मा. मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई. |
| ३ | श्रीमती.मनिषा पाटणकर-म्हैसकर | अपर मुख्य सचिव,गृह विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| ४ | श्री.वेणुगोपाल रेड्डी | अपर मुख्य सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| ५ | श्री. संजय खंदारे | अपर मुख्य सचिव, अन्न व औषध प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| ६ | श्री. रनजीत सिंह देओल | प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, क्रीडा व युवक कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| ७ | श्री.दिलीप घुमरे | प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| ८ | श्री. निपुण विनायक | प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| ९ | श्री.सदानंद दाते | पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई. |
| १० | श्री.देवेन भारती | पोलीस आयुक्त, मुंबई. |
| ११ | श्री. अनुपकुमार सिंह | प्रधान सचिव, गृह विभाग,मंत्रालय, मुंबई. |
| १२ | श्री.धीरज कुमार | सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| १३ | श्री.विरेंद्र सिंह | सचिव, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| १४ | श्री. निखिल गुप्ता | अपर पोलीस महासंचालक (का.व सु.), महाराष्ट्र राज्य, मुंबई. |
| १५ | श्री.सुनिल फुलारी | प्रभारी AD & CID |
| १६ | श्रीमती. ज्योती प्रिया सिंह | विशेष पोलीस महानिरीक्षक,अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, म.रा. पुणे. |
| १७ | श्रीमती. दिपा मुधोळ मुंडे | आयुक्त, समाज कल्याण |
| १८ | श्री.अनिल भंडारी | आयुक्त, वैद्यकीय शिक्षण |
| १९ | श्री. दिपक सिंगला | आयुक्त, क्रीडा व युवा सेवा |
| २० | श्रीमती. यमुना जाधव | उप सचिव,गृह विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| २१ | श्री. प्रविण पाटील | पोलीस उपमहानिरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स,म.रा. पुणे. |

| | | |
|---|---|---|
| २२ | श्री. अनुज तरे | पोलीस अधीक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स,म.रा. पुणे. |
| २३ | श्री. कृष्णांत पिंगळे | अपर पोलीस अधीक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स,म.रा. पुणे. |

प्रस्तावना:-

मा.मुख्यमंत्री महोदयांनी बैठकीस उपस्थितांचे स्वागत केले.

२. सदर बैठकीत राज्यातील अंमली पदार्थाच्या सद्यस्थितीबाबत चर्चा करण्यात आली व अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स कार्यालयाकडून "Druge-Free Maharashtra: Strategy and Action Plan" चे सादरीकरण करण्यात आले. तसेच, सदर बैठकीत पुढील मुद्यांवर चर्चा करून खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

| अ. क्र. | चर्चेचा मुद्दा | बैठकीत घेतलेले निर्णय | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| १ | केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यातून २०२९ पर्यंत अंमली पदार्थांचे पूर्णपणे निर्मूलन करण्यासाठी गृह विभागाच्या माध्यमातून विकसित करण्यात आलेला "A Whole-of-Government Approach" लागू करणे. या धोरणांतर्गत अवैध अंमली पदार्थांची शेती/ लागवड, नैसर्गिक व सिंथेटिक अंमली पदार्थाचे उत्पादन, वाहतूक, विक्री व सेवनावर प्रतिबंध घालण्याबाबत व अंमली पदार्थाच्या प्रचार व प्रसारास आळा घालण्याकरीता विविध प्रशासकीय विभागांना त्यांची जबाबदारी आणि कार्ये निश्चिती करण्याबाबत चर्चा करण्यात आली. | "A Whole-of-Government Approach" धारेण लागू करून या धोरणांतर्गत अवैध अंमली पदार्थाच्या निर्मितीस सहाय्यभूत पिकांची शेती/लागवड, उत्पादन, व्यापार, वाहतूक, विक्री व सेवनावर प्रतिबंध घालण्याबाबत व अंमली पदार्थाच्या प्रचार, प्रसारावर आळा घालण्याकरीता विविध प्रशासकीय विभागांना त्यांची जबाबदारी आणि कार्ये नेमून देण्याच्या प्रस्तावावर मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेने धोरण जाहीर करणे. | गृह विभाग |
| २ | अंमली पदार्थ विरोधी कारवाई अधिक प्रभावी करण्यासाठी महाराष्ट्र विघातक कारवाया प्रतिबंधक अधिनियम, १९८१ | महाराष्ट्र विघातक कारवाया प्रतिबंधक अधिनियम, १९८१ (MPDA) मध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. | गृह विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| | (MPDA) मध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली व सदर सुधारणा शासनाच्या विचाराधीन असल्याचे नमूद केले. | | |
| ३ | अ) अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स कार्यालयातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना ३० टक्के प्रोत्साहन भत्ता लागू करणे. | अ) अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स कार्यालयातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना ३० टक्के प्रोत्साहन भत्ता बाबतच्या प्रस्तावावर तातडीने कार्यवाही करण्यात यावी. | गृह विभाग |
| | ब) अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स मधील कार्यकाल पूर्ण केल्यानंतर पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना स्वैच्छिक पदस्थापना देण्याबाबत चर्चा करण्यात आली. | ब) अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स मधील कार्यकाल पूर्ण केल्यानंतर पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना स्वैच्छिक पदस्थापना करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करावा. | पोलीस महासंचालक,म. रामुंबई. |
| ४ | राज्यातील अंमली पदार्थ आणि मादक द्रव्यांच्या सेवनाचे सर्वेक्षण करण्याच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली. | राज्यातील अंमली पदार्थ आणि मादक द्रव्यांच्या सेवनाचे सर्वेक्षण करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी. | गृह विभाग |
| ५ | राज्यातील अंमली पदार्थांच्या बेकायदेशीर तस्करीला व व्यापाराला आळा घालण्यासाठी "इन्फॉर्मर रिवार्ड पॉलिसी"राज्यात राबविण्याबाबत चर्चा करण्यात आली. | प्रभावी अशा "इन्फॉर्मर रिवार्ड पॉलिसी"चा प्रस्ताव शासनास सादर करावा. | पोलीस महासंचालक,म. रामुंबई. |
| ६ | अंमली पदार्थांच्या प्रकरणामध्ये तातडीने कार्यवाही (Hot Pursuit) करण्यासाठी हवाई मार्गाचा अंवलब अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स कार्यालयातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना करावा लागतो.<br>त्यानुषांगीक शासनाची | अंमली पदार्थांच्या प्रकरणामध्ये तातडीने कार्यवाही (Hot Pursuit) करण्यासाठी हवाई मार्गाचा अंवलब करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करावा. | पोलीस महासंचालक, म.रा.मुंबई. |

| | | | |
|---|---|---|---|
| | मान्यता व येणार खर्चाबाबत चर्चा करण्यात आली. | | |
| ७ | राज्यातील अंमली पदार्थांच्या तस्करीला आळा घालण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय NCORD समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीचे मुल्यमापन करण्याकरीता चर्चा करण्यात आली. | राज्यातील अंमली पदार्थांच्या तस्करीला आळा घालण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय NCORD समिती आहे. सदर समितीचे कार्य अधिक प्रभावी करण्यासाठी कृती आराखडा (Framework for District NCORD Evaluation) तयार करणे. | पोलीस महासंचालक, म.रा.मुंबई. |
| ८ | NDPS Act अंतर्गत दाखल गुन्ह्यांचा जलद गतीने निपटारा करण्यासाठी Exclusive NDPS Court स्थापन करण्याबाबत व अंमली पदार्थांच्या गुन्ह्यांमध्ये दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्यासाठी विशेष सरकारी अभियोक्ता यांचे पॅनल नियुक्त करणे. | NDPS Act अंतर्गत दाखल गुन्ह्यांचा जलद गतीने निपटारा करण्यासाठी Exclusive NDPS Court स्थापन करण्याबाबत कार्यवाही करावी व अंमली पदार्थांच्या गुन्ह्यांमध्ये दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्यासाठी विशेष सरकारी अभियोक्ता यांचे पॅनल नियुक्त करण्याबाबत कार्यवाही करावी. | पोलीस महासंचालक, म.रा.मुंबई यांनी प्रस्ताव सादर करावा. विधि व न्याय विभागाने मान्यतेची कार्यवाही करावी. |
| ९ | इयत्ता ५ वी पासूनच्या शालेय अभ्यासक्रमात अंमली पदार्थ जनजागृती संदर्भात किमान एक पाठ (Chapter) करणे. | इयत्ता ५ वी पासूनच्या शालेय अभ्यासक्रमात अंमली पदार्थ जनजागृती संदर्भात किमान एक पाठ (Chapter) समाविष्ठ करण्याची कार्यवाही करावी | शालेय शिक्षण विभाग |
| १० | बृन्हमुंबई महानगर पालिका क्षेत्राकरीता आधुनिक सुविधांसह परिपूर्ण व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्र (Centre of Excellence ) पथदर्शी प्रकल्प स्वरूपात प्राथम्याने स्थापन करण्याबाबत चर्चा करण्यात आली. | बृन्हमुंबई महानगर पालिका क्षेत्राकरीता आधुनिक सुविधांनी युक्त व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्र (Centre of Excellence) पथदर्शी प्रकल्प स्वरूपात प्राथम्याने स्थापन करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. | नगर विकास विभाग/बृहन्मुंबई महानगरपालिका |
| ११ | सर्व वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये तीव्र प्रमाणात व्यसनाधीन (Severe Addicts) व्यक्तींवर Tertiary Care Medical Intervention करीता तसेच एकत्रित उपचार व | सर्व वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये तीव्र प्रमाणात व्यसनाधीन (Severe Addicts) व्यक्तींवर Tertiary Care Medical Intervention करीता तसेच एकत्रित उपचार व पुर्नवसनासाठी | वैद्यकीय शिक्षण विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| | पुर्नवसनासाठी अद्यावत यंत्रणा/ केंद्र उभारणाबाबत चर्चा करण्यात आली. | अद्यावत यंत्रणा/केंद्र उभारणाबाबत कार्यवाही करणे. | |
| १२ | सर्व शैक्षणिक संस्थांचा/ महाविद्यालय तसेच विद्यापीठाचा परिसर हा Drug Free Campus ठेवण्याबाबत निकष निश्चित करणे. तसेच, सर्व Campus अंमली पदार्थ मुक्त कसे होतील याबाबत प्रभावी मोहिम राबविण्याबाबत चर्चा करण्यात आली. | सर्व शैक्षणिक संस्थांचा/महाविद्यालय तसेच विद्यापीठाचा परिसर हा Drug Free Campus ठेवण्याबाबत निकष निश्चित करणे. तसेच, सर्व Campus अंमली पदार्थ मुक्त कसे होतील याबाबत प्रभावी मोहिम राबविणे. | उच्च शिक्षण विभाग |
| १३ | नियंत्रित औषधांची (Scheduled Drug) अवैध विक्री/पुरवठा यास प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली. | नियंत्रित औषधांची (Scheduled Drug) अवैध विक्री/पुरवठा यास प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करणे. | अन्न व औषध प्रशासन विभाग |
| १४ | देशातील सर्वोत्तम ५ ते १० Deaddiction Centres/ Rehabilitation Centres चा अभ्यास/ पहाणी दौरा करून राज्यात सर्वोत्तम Deaddiction Centres/ Rehabilitation Centres स्थापन करण्याबाबत चर्चा करण्यात आली. | देशातील सर्वोत्तम ५ ते १० Deaddiction Centres/ Rehabilitation Centres चा अभ्यास/ पहाणी दौरा करून राज्यात सर्वोत्तम Deaddiction Centres/ Rehabilitation Centres स्थापन करणे. | सार्वजनिक आरोग्य विभाग/ वैद्यकीय शिक्षण विभाग/ अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स.म.रा.पुणे. |

***************